# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 Impact Factor - 7.139 Indexed (SJIF)

March 2020 Special Issues- 25 Vol. 2


# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)


Chief Editor
Mr. Arun B. Godam

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar



Balbhim Arts, Science & Commerce College, Beed


79


Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**March 2020 Special Issue- 25 Vol. 2**

# The Current Issues in Social Sciences in India (CISSI-2020)

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

Guest Chief Editor
Prof. Dr. B. D. Kokate (I/C Principal)

Dr. S. S. Undare (Vice Principal)
Dr. G. A. Mohite (Vice Principal)

Editor
Dr. R. K. Kale

Co-Editors
Dr. S. N. Akulwar
Dr. B. D. Jadhavar
Dr. S. E. Ghumatkar

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

Shaurya Publication, Latur



80

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 19. | "भारतातील चलनाचे निश्चलीकरण : कारणे आणि परिणाम" <br> डॉ. देविदास नागरगोजे | 75 |
| 20. | भारतीय राज्यघटना आणि मानव अधिकार <br> प्रा. धर्मराज केशवराव कटके | 78 |
| 21. | वैदिक व उत्तरवैदिक कालखंडातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा एक मिमांसा <br> फकिरा भगवान राजगुरू | 84 |
| 22. | उपासमार आणि कुपोषण या समस्येवर शालेय पोषण आहार योजनेचा झालेला सकारात्मक परिणाम <br> वर्षा शेषराव गाडवे | 90 |
| 23. | संयुक्त कुटुंब पध्दतीचा ऱ्हास : कारणे व परिणाम <br> प्रा. गाडवे मनिषा महारुद्र | 93 |
| 24. | नागरिकत्व सुधारणा कायदा : भ्रम आणि वास्तव <br> डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड | 96 |
| 25. | भारतातील राज्यनिहाय ग्रामीण व नागरी बेरोजगारी दर : कारणे आणि उपाय <br> डॉ.गणेश बापूराव गावंडे | 100 |
| 26. | दहशतवादाचे स्वरूप व उपाययोजना Nature of Terrorism and Remidies <br> सुर्यवंशी गणेश दामाजी | 107 |
| 27. | मराठवाड्यातील सामाजिक चळवळीत शैला लोहियांचे योगदान <br> डॉ. गंगणे आर. व्ही. | 112 |
| 28. | आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकास <br> गौतम नागनाथ येडे | 116 |
| 29. | महिला सबलीकरण आणि भारतीय धोरणे <br> भगवानसिंग देवेसिंग गिरासे | 118 |
| 30. | ग्रामीण विकासात माहिती तंत्रज्ञानाची भुमिका <br> प्रा. डॉ. चंद्रषेखर इं. गित्ते | 122 |
| 31. | राज्यपाल : राज्य प्रशासनातील बदलत्या भूमिकेचे विश्लेषण <br> प्रा.डॉ. ए. एल. गोरे | 127 |
| 32. | भारतातील बेरोजगारी - कारणे आणि उपाय <br> प्रा. डॉ. गोवर्धन खेडकर | 131 |
| 33. | भारताच्या विदेशी व्यापाराची संरचना : एक अभ्यास <br> प्रा. डॉ. गोवर्धन के. वायसे, प्रा. डॉ. सुरेश ई. घुमटकर | 134 |
| 34. | राज्यपालाचे प्रशासनातील स्थान, भूमिका आणि अधिकार व कार्ये <br> प्रा. डॉ. सुधाकर एस. हांगे | 137 |
| 35. | हुंडा प्रथा : एक सामाजिक समस्या <br> प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु. | 140 |
| 36. | महिला सक्षमीकरण: कायदे आणि योजना <br> प्रा. डॉ. हरी साधू वाघमारे | 143 |
| 37. | सबाल्टर्न इतिहासलेखणाची वैचारिक भूमिका : एक अभ्यास <br> डॉ. इंगळे चत्रभूज बंकटराव | 150 |




81

Scanned with OKEN Scanner

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 25, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
March 2020 | SJIF | Impact Factor : 7.139

# हुंडा प्रथा : एक सामाजिक समस्या

*प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.*

इतिहास विभाग प्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

*'मोलभाव था यह किसीके सपनो का । दाव खेला जा रहा था उसके जीवन का ।*

*अरमानोका हुआ कुछ ऐंसा व्यापार । वस्तु का कोई नही था उसमे विचार ।।'*

- कर्णिका पाठक

भारतात प्राचीन कालखंडापासुन अनेक बंधनाने जखडलेल्या घटकांमध्ये स्त्रियांचा सुद्धा उल्लेख प्रामुख्याने केला जातो. स्त्री ही कित्येक काळापासून दारिद्र्यात खितपत पडलेली वा सामाजिक दृष्ट्या दुय्यम गणल्या गेलेल्या आहेत. मध्ययुगीन कालखंडात देखील स्त्रियांच्या सामाजिक, शैक्षणिक वा आर्थिक दर्जात विशेष असा काही बदल जाणवल्याचे दिसून येत नाही. प्राचीन कालखंडाप्रमाणेच स्त्री ही उपभोग्य वस्तु प्रमाणेच गणल्या जात असल्याचे दिसून येते. पुढे आधुनिक कालखंडामध्ये परंपरागत चालत आलेल्या स्त्री गुलामगिरीला काही प्रमाणात वाचा फोडण्याचे कार्य काही स्वतंत्र चळवळीतील नेतृत्वाने अथवा समाज सुधारकांनी केले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीचे स्थान देण्याचे कार्य घटनाकारांनी केले आहे व एक प्रकारे अनेक काळापासून स्त्रीयांवर लादल्या गेलेली सामाजिक गुलामगिरी, शैक्षणिक मागासलेपणा, धार्मिक कर्मकांड यांच्यापासून त्यांची सुटका करून त्यांना या सर्व बंधनातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. आजच्या युगात स्त्रीया स्वकर्तृत्वाने, पराक्रमाने आपआपल्या हिंमतीवर अनेक क्षेत्रे पादाक्रांत करतांना आपणास दिसत आहे. त्या पुरूषांच्या बरोबरीने अनेक कामगिरी पार पाडताना दिसत आहेत. असे असले तरी ज्या विधवा विवाह न करणे, सतीप्रथा, केशवपण, बालविवाह अशा अनेक सामाजिक समस्यातून काही प्रमाणात का होईना स्त्रीयांची सुटका होत असताना हुंडा प्रथा सारख्या सामाजिक समस्येमध्ये स्त्रीयांचा आजही नाहक बळी जात असताना आपणास दिसून येत आहे. प्रस्तुत शोध निबंधातून हुंडा प्रथेवर सामाजिक समस्या म्हणून प्रकाश टाकण्यात आला आहे.

**हुंडा प्रथा : सामाजिक समस्या**

आज घडीला समाजाला अनेक समस्या भेडसाऊ पाहत आहेत. त्या पैकी एक म्हणजे हुंडा. हुंडा म्हणजे काय याचा अर्थ सांगणाऱ्या अनेकांनी आपआपल्या परीने व्याख्या केल्या आहेत. काही व्याख्या पुढील प्रमाणे.

वेबस्टरचा शब्दकोश : विवाहाच्या वेळी स्त्री आपल्या सोबत जी संपत्ती, मौल्यवान वस्तु आणते त्याला हुंडा म्हणतात.

फेअर चाईल्ड : हुंडा म्हणजे संपत्ती अथवा धन होय. जे विवाहाप्रसंगाच्या वेळी वधुचे आईवडिल अथवा जवळच्या नातेवाईकाकडून, वरसाकडून दिल्या जाते.

विवाहपूर्वी, विवाहाचे वेळी किंवा विवाहानंतर (अ) एका पक्षाने दुसऱ्या पक्षाला (ब) कोणत्याही पक्षाच्या मातापितरांनी वा अन्य व्यक्तींनी, अन्य पक्षाला वा इतर कोणा व्यक्तीला दिलेली वा देण्याचे मान्य केलेली मालमत्ता वा अन्य मुल्यवान वस्तुचे स्वरूपातील इतर रक्कम म्हणजे हुंडा होय.[1]

भारतात प्राचीन काळात विवाह समारंभाच्या प्रसंगी वधूला तिच्या समवेत भेट म्हणून गाई, हत्ती, घोडे, अलंकार अशा प्रकारची संपत्ती भेट म्हणून देण्याची पद्धती अस्तित्वात असल्याचे अनेक उदाहरणे दिसून येतात. अथर्ववेदात विवाहाच्या वेळी वधु पित्याने वरास शंभर गाई दिल्या पाहिजेत असा उल्लेख मिळतो. महाभारतात द्रोपदी, सुभद्रा आणि उत्तरा यांच्या सोबत हत्ती, घोडे व वस्त्र अलंकार दिल्याचे निर्देशन आहे. जातककथांमधून ही त्यास मान्यता मिळते. स्मृती ग्रंथांमध्ये आठ विवाह प्रकार दिले आहेत. त्यापैकी आर्ष विवाहात वधुपित्याने वराकडून गाय, बैल घेऊन कन्या द्यावे असे म्हटले आहे. मात्र मनुने कन्या मुल्य घेण्याच्या पद्धतीचा निषेध केला आहे. बौद्धधर्माने मुलीला विकणे म्हणजे नरक प्रत जाणे अशा शब्दात टिका केली आहे. ब्राह्म विवाहात वधुपिता योग्य वराची निवड करून त्यास उपहारासह कन्या देत असे.[2] अशाप्रकारे प्राचीन ग्रंथातून काही प्रमाणात का असेना हुंडा पद्धती प्राचीन समाजात देखील रूढ असल्याची साक्ष मिळते. मध्ययुगीन कालखंडामध्ये ही प्रथा प्रचलित राहिली. आधुनिक भारतीय समाजातील सद्यकालीन अनेक सामाजिक समस्यांमध्ये कौटुंबिक जीवनाशी निगडीत गंभीर समस्या म्हणून अग्रक्रमाने हुंडा समस्येचा उल्लेख करण्यात येतो. तसे पाहिले तर



82

Scanned with OKEN Scanner

Special Issue 25, Vol. 2
March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139

सामाजिक संस्कारात विवाहाला एक पवित्र संस्कार मानला जातो. परंतु विवाह प्रसंगी होणाऱ्या हुंड्याचा करार अधिक-अधिक प्रभावशाली झाल्यामुळे विवाहाचे पवित्र संपुष्टात येत असल्याचा भास निर्माण होत आहे. त्यामुळेच आजच्या सामाजिक परिस्थितीत हुंडा एक समस्या बनु पाहत आहे. याचे कारण 'हुंड्याच्या प्रश्नाचे आघात व्यक्ती, कुटुंब आणि समाज जीवनावर विविध प्रकारे झाले आहेत. हुंड्याच्या वाढत्या अभिलाषेतून नववधूंना जाळणे, त्यांचा शारीरिक व मानसिक छळ करणे, त्यांना आत्महत्येला प्रवृत्त करणे, हुंडयापासून आईवडिलांची मुक्तता करण्यासाठी अविवाहीत राहणे, यासारखे अनेक प्रश्न उद्भवलेले आहेत.[3] आज स्वातंत्र्याची प्राप्ती होऊन बराच काळ लोटला, समाजाने आधुनिकिकरणाची, वैज्ञानिक दृष्टीकोन अंगिकारला आहे. तसेच समाजातील अनेकांनी या समस्याला वाचा फोडत समाजात जनजागृती करण्याचे कार्य केले आहे. तरीसुद्धाही हुंड्याचा प्रश्न काही कमी होताना दिसून येत नाही. तर उलट प्राचीन काळात काही जाती-जमातीमध्ये वधु मूल्य देण्याची प्रथा परंपरा होती. त्या जातीजमाती मध्ये आजच्या आधुनिक युगात वर मुलांची परंपरा रूढ होताना दिसून येत आहे. आजच्या परिस्थितीमध्ये भारतःसारख्या विशाल खंडप्राय देशामध्ये सर्वत्र हुंडा देण्याचे प्रमाण कमी जास्त असले तरी ही प्रथा सर्वच प्रदेशात असल्याचे दिसून येते.

सालंकृत कन्यादान हे मोक्ष प्राप्तीसाठी (स्वर्ग प्राप्तीसाठी) आवश्यक मानल्या गेलेल्या 10 महादानांपैकी एक दान समजले जात असल्यानेच सर्वप्रथम धर्मशास्त्र हुंडाप्रथा प्रथम आली असावी. असे असले तरी हुंड्याचे काही करणे यामध्ये या प्रथेला धार्मिक मान्यता असल्याने ही प्रथा जोपासली जाते. हुंडा हा आजच्या समाजात प्रतिष्ठेचा मानला गेल्याने विवाहानंतर वधुला वर पक्षाकडील मंडळीकडून त्रास न होण्यासाठी वधुपिता हा वरपक्षाकडील मंडळीचा मान सन्मान राखण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी त्याच्याकडून विविध कामासाठी मागणी होते ती पूर्ण करण्यातून ही प्रथा जोपासली जाते. त्याचबरोबर वधु व वरांमध्ये आर्थिक तफावत असेल तर तीही काही प्रमाणात भरून काढण्यासाठी[4] अशा प्रकारे विविध प्रकारच्या कारणाबरोबरच 'नॅशनल कमिटी फॉर विमेन'द्वारे अभ्यास करण्यात आला तेंव्हा हुंड्याच्या आवश्यकतेबद्दल वेगवेगळ्या प्रदेशातील वेगवेगळी कारणे सांगितली आहे. तरीही वधुला तिच्या योग्यतेचा पती मिळावा आणि तीला सुखात राहता यावे या उद्देशाने हुंडा दिला जातो असे या समितीला प्रामुख्याने आढळुन आले.[5] अशा प्रकारच्या विविध कारणांमुळे हुंड्यासारखी समाज विघातक प्रथा आज समाजाच्या मुळाशी घट्ट पकडून बसल्याचे दिसून येत आहे. आजच्या 'स्त्री-जीवनाशी अत्यंत निगडीत असलेल्या आमच्या विवाह पद्धतीकडे येथे दिसणारे दृश्य अगदी वरवर पाहिले तरी अत्यंत विरोधपूर्ण व आमच्या वर्गाची निश्चितता दाखवणारे आहे. ते पाहत असता आमच्या स्त्रीला सध्या स्वतंत्र, समान दर्जा, समान हक्क, समान संधी वगैरे काही मिळाली आहे हे खरे सुद्धा न वाटावे इतके ते त्या कल्पनांशी विसंगत आहे. विवाहातील आमचे वधुवर संशोधन, मुलीला दाखविण्याची पद्धती, शिक्षण मिळाले असताही मुलींना अगदी थेट गुलामांच्या बाजारात नेऊन उभे केल्याची भावनाच उभी करते. हुंड्याची पद्धत बेकायदेशीर असताही इतकी बोकाळली आहे की दोन तीन मुलींची लग्ने करवयाची म्हटले की मध्यम स्थितीतील आईबाप त्या ओझ्याखाली मेटाकुटीस येतात.[6] सर्वसाधारण मध्यमवर्गीय स्थळ मिळविण्यासाठीही वधुपित्याला मोठी हुंडारूपी रक्कम मोजावी लागत आहे. आजच्या घडीला एकून विवाहांपैकी 85-90 टक्के विवाह हे हुंडा दिल्याशिवाय होत नसल्याचे दिसून येते. हे रोखण्यासाठी 1961 साली प्रतिबंधक कायदाही पास करण्यात आला. मात्र या कायद्याचा प्रभाव पाहिजे तसा पडला नाही. म्हणून सन 1984 मध्ये यात दुरूस्ती करून 1985 मध्ये हा कायदा लागू केला गेला. यात हुंड्यासाठी कमीतकमी 6 महिने ते 2 वर्षापर्यंत शिक्षा व 10 हजार रूपये दंड ठोठावण्यात आला. 1986 मध्ये यात पुन्हा दुरूस्ती करण्यात आली व हुंडाबळीचा मृत्यू म्हणून स्वतंत्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली. आजही दर दोन तासाला एक हुंडाबळी जात आहे.[7] यावरून असे दिसून येते की आज एक बाजूला स्त्री शिकून उभी होत असताना दुसऱ्या बाजूला विवाह ठरवतांना जेवढे जास्त शिक्षण तेवढा जास्त हुंडा असे चित्र दिसून येत आहे. हुंडा हा देणे व घेणे हा गुप्त व्यवहार असल्याने व त्याला दोन्ही पक्षाची (वधुपक्ष व वरपक्ष) मान्यता असल्याने ही समस्या अधिक जटील बनली आहे. आज हुंड्याशिवाय अनेक स्त्रीयांची विवाह न होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकंदरीत स्त्रीयांची माणुसकी, स्वतंत्रता, समान हक्क, समान दृष्टी ही सर्व मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. हे सर्व थांबवण्यासाठी विवाहापूर्वीच मुलींना पारंपारिक, व्यावसायिक, तांत्रिक उच्च शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी करावे, मुलींना हुंड्यासंबंधीच्या कायद्याचे पूर्ण ज्ञान द्यावे, महिलांना नोकरीत 30 टक्के जागा राखीव या तत्त्वाची अंमलबजावणी व्हावी, सामाजिक संस्था, संघटनांनी हुंड्याबद्दलची चर्चा सत्रे, व्याख्याने, सभा, कार्यशाळा आयोजित करण्यात याव्यात, वर्तमानपत्रे, रेडिओ, दुरदर्शन आदींद्वारे हुंडाबळींच्या प्रश्नावर समाजाचे प्रबोधन करण्यात यावे, हुंडा घेणाऱ्या मुलाशी लग्न करणार नाही अशी एक मुलींची चळवळ उभी राहिली पाहिजे. शाळा



83

Special Issue 25, Vol. 2 March 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139


महाविद्यालयात या प्रश्नावर मुला-मुलींचे प्रबोधन व्हावे.[8] या सर्व उपाययोजनेद्वारे हुंड्यासारख्या सामाजिक समस्येला काही प्रमाणात का होईना आळा बसण्यास मदत होईल असे वाटते.

सारांश रूपाने हुंडा ही आजच्या घडीला समाजासमोर उभी राहिलेली एक मोठी सामाजिक समस्या बनली आहे. यावर दादासाहेब खेधे म्हणतात, हुंडा हा एक सामाजिक कलंकच आहे, पण या देशात हुंड्याची पद्धत अशी काही रूढ झालीय की, हुंडा प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असतानाही या कायद्याला कुणी जुमानत नाही. त्यामुळे या देशात हुंड्यापायी लाखो लेकी-बाळींना आपले प्राण गमवावे लागलेत. तर कित्येक महिलांच आयुष्य उद्ध्वस्त झालेले आहे. समाजात काही सामाजिक संघटनांनी हुंडा विरोधी चळवळ सुरु केली पण या चळवळीचा फारसा प्रभाव पडला नाही. त्यामुळे आजही देशाच्या वेगवेगळ्या भागात हुंडा घेऊनच लग्न केली जात आहेत. जे सधन आहेत ते हुंडा देताहेत पण एखादे गरिब कुटुंब असेल अन् त्याच्याकडे हुंडा देण्यासाठी पैसा नसेल तर त्याच्या मुलीचे लग्न होत नाही. या हुंड्याच्या काळजीमुळेच काही लोकांना मुली नकोशा होतात. त्यामुळे 'बेटी बचाव' आंदोलन करणाऱ्यांनी सर्वात प्रथम हुंडाविरोधी कठोर अभियान राबवण्यास सरकारला भाग पाडायला हवं.

**संदर्भसूची :**


1. गर्गे स. मा. (2007), 'भारतीय समाज जीवन कोश', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, द्वितीय खंड, पृ.क्र. 194.
2. डॉ. खडसे भा. कि., 'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या', हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, पृ.क्र. 115.
3. कित्ता, पृ.क्र. 114.
4. डॉ. गाठाळ एस. एस. (2013), 'भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन', कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद, पृ.क्र. 339.
5. उपरोक्त गर्गे, स. मा., पृ.क्र. 195.
6. संपा. भोळे भास्कर लक्ष्मण, 'विसाव्या शतकातील मराठी गद्य', खंड 2, साहित्य अकादमी प्रकाशन, पृ.क्र. 203.
7. कुलकर्णी पी. के. (1998), 'भारतातील सामाजिक समस्या', विद्या प्रकाशन नागपुर, प्रथमावृत्ती, पृ.क्र. 251.
8. उपरोक्त डॉ. गाठाळ एस. एस., पृ.क्र. 340.





Scanned with OKEN Scanner